ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 8 | APRIL - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

स्त्रीवादी समीक्षा : एक अभ्यास

प्रा. नवले राजू नागनाथ
वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर .

प्रस्तावना

मराठी स्त्री - स्त्रीवादी समीक्षाचे चिकित्सा (इ.स. १९७५ ते १९९५) हा माझ्या संशोधनाचा विषय. स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून स्त्री आत्मचरित्र समीक्षाचा अभ्यास करण्याचे योजल्यामुळे स्त्रीवाद या संकल्पनेचा प्रारंभापासून इतिहास लक्षात घेतला आहे. संपूर्ण स्त्री मुक्तीच्या संदर्भात स्त्रीवादी विचारसरणीचे वेगवेगळे पैलू नजरेस येतील. तरी ही वाङ्मयीन कला कृतीकडे पाहण्याचा स्त्री केंद्री दृष्टीकोन आणि समाजातील रुढ पितृसत्ताक पध्दतीला वाङ्मयीन स्त्रीवादी समीक्षेचे वर्णन करता येईल. फिमेल म्हणजे स्त्री, फेमिनिझम म्हणजे स्त्री प्राधान्य व फेमिनिस्ट म्हणजे स्त्रीवादी होय. स्त्रियांनी लिहिलेली पुस्तके पुरुष प्रधानतेला आव्हान देणारी असतातच असे नाही, उलट पुरुषप्रधान संस्कृतीने निर्माण केलेल्या भाषिक व वाङ्मयीन ढाच्यातच बऱ्याच स्त्रिया लेखन करताना दिसतात. स्त्री साहित्याची वाङ्मयीन परंपरा स्त्रीवादी म्हणता येत नाही. रोजलिड कावर्डच्या "आह वुमेन नॉव्हेल फेमिनिस्ट नॉव्हेल्स" या निबंधात स्त्रीवादी लिखान व स्त्रियांचे लिखाण यातील फरक चांगला दाखवला आहे. स्त्री केंद्री लिखान स्त्री केंद्री साहित्याचा स्त्री प्रधानतेशी (फेमिनिझम) काही संबंध असतोच असे नाही व स्त्रीवादी साहित्य त्यापासूनही दूर असते. स्त्रीवादाने स्त्रियांबरोबर पुरुषांनाही स्त्रियांबद्दल पुन:विचार करायला प्रवृत्त केले. स्त्रीवादी समीक्षामुळे ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमी वरील स्त्रीचे प्रतिनिधित्व याची जाणीव करुण दिली.

संशोधनाचे स्वरुप

पाश्चात्य स्त्री मुक्ती चळवळीची वाटचाल पाश्चात्य स्त्रीवादी सौंदर्यशास्त्राच्या उभारणीत फेमिनिस्ट करणे सिझम ही आकाराला आलेली समीक्षा पध्दती मराठातील स्त्रीवाद भारतातील स्त्री सुधारणा चळवळीची वाटचाल स्त्री चळवळीतील कार्यकर्त्या अभ्यासकांनी मांडलेली स्त्रीवादाची भूमिका याच्या परिशीलनातून स्त्रीवादी विचारांचा वाढता प्रभाव, स्त्रीवादी समीक्षेचे उपयोजन, विविध साहित्य प्रकारांचे स्त्रीवादी वाचन करीत स्त्रीवादी परिप्रेक्ष्य कसे विकसित होते याचा शोध घेतला. स्त्रीवादी वाचन पध्दती आणि स्त्रीकेंद्री अभ्यास पध्दती यांची स्त्रीवादी समीक्षेच्या उपयोजनातील भूमिका लक्षात घेतली. या अभ्यासावरुन स्त्रीवादी चिकित्सेची दिशा शोधण्याचा प्रयत्न करता आला. पुरुष सत्तकता व लैंगिक विषमता या विरोधी भूमिका घेवून स्त्रीच्यार स्वत्वाचा आणि अस्तित्वाचा स्थापनेचा महत्वाचा भाग दृष्टीकोन बाळगणारे समीक्षा म्हणजे स्त्रीवादी समीक्षा होय. हेच या संशोधनाचे अधिष्ठान आहे हे ही लक्षात घेता आले.

इ.स. १९७५ ते १९९५ या कालखंडातील जवळ जवळ नव्वद मराठी स्त्री आत्मचरित्राचे स्त्रीवादी समीक्षांची चिकित्सा करताना त्यांचे वर्गीकरण केले. साहित्यकांच्या पत्नी स्वत: साहित्यिक स्त्रिया, विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या पत्नी, गृहिणींच्या भूमिकेतील स्त्रिया, स्वत: सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्त्रिया, विशिष्ट अनुभवाचे कथन करणाऱ्या स्त्रिया, कलाक्षेत्रात कार्य करणाऱ्या व दलित समाजातील स्त्रिया या प्रवर्गाच्या क्रमाने स्त्रियांच्या आत्मकथनामागील प्रेरणा व लेखिकेचे जीवनदर्शन यांचा वेध घेतला आहे.

स्त्रीत्व आणि पुरुषत्व

स्त्रीत्व आणि पुरुषत्व या संकल्पना समाज संस्कृतीच्या परंपरेत कशा घडत जातात. काही अनुभवातून त्या गृहित कल्पनांना कसे तडे देता येतात यावरही प्रकाश टाकलेला आहे. प्रत्यक्षात स्त्रित्वाचे मानलेले आणि पुरुषत्वाचे मानलेले कोणतेही गुण स्त्री किंवा पुरुष या व्यक्तिमध्ये कमी अधिक प्रमाणात कसे असतात हे सप्रमाण अधोरेखित केलेले आहे.

आजच्या स्त्रिच्या नव्या जाणीवांचा शोध

शोध हे उत्तम प्रकारे घेता आला आहे. स्त्रियांना शिक्षण मिळाले, अर्थार्जन करण्याची विविध क्षेत्रात कार्य करण्याची संधी मिळाली, या भौतिक परिवर्तनातून त्यांच्या जीवनात परिवर्तन झाल्याचे दिसते. परंतु विवाह संस्था, कुटुंब संस्था, पारंपारिक संस्कार यातून पुरुषी मूल्यामुळे त्यांचा कोंडमारा मोठया प्रमाणात त्यांच्या लक्षात येत आहे. स्त्री म्हणून समाज संस्कृतीच्या परंपरेने केलेला अन्याय अनेक लेखिका प्रकर्षाने आधोरेखित करतात. पती-पत्नी नात्यात, सामजस्यपूर्ण सहचर्य आणि अहंकार भावना न जोपासता स्नेहशील मित्रत्वाच्या नात्याची अपेक्षा करतात. पारंपारिक मूल्यांना छेद देऊन स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करतात. परंपरेतून नवे परिवर्तन घडून पाहतात. काळाप्रमाणे रुढींना विधायक वळण देतात, राजकीय व सामाजिक क्षेत्रात कार्य करताना स्त्री प्रश्नांची सोडवणूक करण्याचे भान एकूणच स्त्री आत्मचरित्र-समीक्षातून विद्यमान काळातील स्त्रिच्या दुय्यमतेचे वास्तव हे पुरुषी मूल्य व्यवस्थेमूळे कसे रुजलेले आहे हे स्पष्टपणे दाखवून देता आलेले आहे. तसेच स्त्रिच्या नव्या जाणीवांचा शोधही घेता आलेला आहे.

स्त्रीवाद : स्त्री प्रतिमा व पार्श्वभूमी

इ.स. १८६३ च्या आधीपासून स्त्रीचे स्वत:ची ओळख पटवून घ्यायला सुरुवात केलेली होती. या काळात उच्च शिक्षण घेणे, करिअर करण्याचा हक्क व पुरुषांच्या मत्सरातून जन्माला आलेल्या विकृतीचे बळी अशी त्यांची संभावना झाली. म्हणून शिक्षण आणि सामाजिक कार्यातील क्रियाशील सहभाग या स्त्रियांच्या प्राथमिक गरजा आहेत याची जाणीव होवू लागली. स्वत:च्या गृहिणी या भूमिकेला ठाम नकार देणे याचा अर्थ घर संसार सोडणे असा नव्हे. घर, आईपण यांच्याच बरोबर करिअरही तितकीच महत्वाची व ती या गोष्टी बरोबरही करता येते हे समजून घेणे महत्वाचे.

राजकारणातही गृहिणी म्हणून नव्हे तर नागरिक म्हणून तिला स्थान मिळायला हवे. स्त्रीवादी साहित्य वा समीक्षा ही स्त्रीवादाची केवळ एक शाखा आहे. स्वत:चेच अस्तित्व विसरुन गेलेल्या स्त्रीने डोळे उघडून जगाकडे पहायला सुरुवात केल्यावर ज्यावेळी तिला मुख्य प्रवाहातून आपण फेकलो गेल्याची जाणीव झाली त्यावेळी आपल्या अस्तित्वासाठी पाय रोवायला स्त्रीने आपल्या संपूर्ण सामर्थ्यानिशी सुरुवात केली व स्त्रीच्या अध:पतनामागचे पुरुषी राजकारण तिला समजू लागले.

सामाजिक दस्तऐवज

सामाजिक दस्तऐवज या स्वरुपाच्या पलीकडे जाऊन काही स्त्रियांच्या आत्मकथनात वाचनियता आलेली आहे. स्त्रियांना समाजातील महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या कामात स्त्रियांचा सहभाग असावा व तसेच निर्णय प्रक्रियेत महत्वाचे स्थान ही दिले पाहिजे. जीवनातील चरित्रात्मक तपशीलच केवळ महत्वाचा न ठरता त्यांची निवडपूर्ण रचना, जीवनातील घटना, दु:ख व अनुभव यांच्या भोवतीच्या भावभावना, चिंतन, विश्लेषण महत्वाचे ठरलेले आहे. जीवनातील घटनामधून लेखिकांना जे भावसत्य जाणवते ते अनुभवांच्या विश्लेषणातून काही लेखिका वाचकाला विचार प्रवृत्व करतात. ही बाजू या आत्मचरित्र समीक्षांना वाङ्मय पातळीकडे कसे नेते याचा ही शोध येथे घेतलेला आहे.

नॅथिनिअल हॉथॉर्न या लेखकावर शोध निबंध लिहताना

अमेरिकन वाङ्मय परंपरेत स्त्रियांची पुस्तके इतक्या कमी संख्येने का टिकून राहिली असा प्रश्न मीना बायम या प्राध्यापिकेला पडला. १८५४ मध्ये हॉथॉर्नने आपल्या प्रकाशकांकडे खरडणाऱ्या लेखिकांच्या मोठया संख्येबदद्दल आणि आपला वाचकवर्ग व पुस्तक विक्री या लेखिका मोठया संख्येने स्वत:कडे खेचून घेत आहेत अशी तक्रार केली होती.

१९ व्या व २० व्या शतकातील वाङ्मयीन प्रतिमा हया देखील इतक्या पितृसत्ताक होत्या की हया काळातील वाङ्मय वाचणे म्हणजे पितृसत्ताक संस्कृतीचे दर्शन घेण्यासारखे आहे. समीक्षा क्षेत्रातली ॲर्नाल्ड पासून पुढे टी.एस. इलियट, क्लीन्थ बुक्स, नॉर्थरोप फाय यांच्यां पर्यंतची समीक्षा केवळ मूल्यवादीचच नव्हे तर सैध्दांतिकही बनली. अर्थात हे धर्मगुरुचे काम पुरुषच करु शकत होते.

परंतु आज जग फार मोठ्या प्रमाणात बदलत आहे. आज जग संगणकांच्या दृष्टीने वाढत चालले आहे. आज म्हणजे २१ व्या पिढीत स्त्रीला फक्त चुल आणि मुलच संभाळणे नव्हे तर ऑफिस असो किंवा कार्यालय तर कलेक्टराची नौकरी घरच्या जबाबदारी संभाळता प्रत्येक कामात स्त्री पुढे आहे. आजच्या काळात स्त्रिचा शिक्षणात तर पहिला क्रमांक आहेच तसेच पाहता कोणत्याच गोष्टीत स्त्री मागे वळून पाहत नाही. दु:ख असो वा सुख प्रत्येक गोष्टीचा सामना करु शकते.

निष्कर्ष

१. स्त्रीवादी चरित्रातून समीक्षेतून स्त्रीयांच्या प्रश्नाला वाच्या फुटलेली आहे असे मला वाटते.
२. स्त्रीवादी समीक्षेतून स्त्री जीवनाच्या विविध प्रश्नावर प्रकाश पडला आहे.
३. स्त्रीयांचे भावविश्व समजून घेण्यात मदत होते.
४. सामाजिक, राजकीय व भावनिक इ. टप्पे
५. स्त्रीयांच्या लेखनावर विविध प्रकारचे संस्कार करता येतील.

समारोप

स्त्री ही आपले दु:ख, वेदना, समस्या मांडण्याचा प्रयत्न करीत आहे ही कौतुकास्पद गोष्ट आहे. स्त्रीवाद म्हणजे पुरुषांपासून फारकत घेऊन स्वत:चा सवता सुभा निर्माण करणे नव्हे पण संस्कृतीच्या हजारो वर्षाच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारुन तिला जी पशुतूल्य अवस्था प्राप्त करुन दिली, त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करुन घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे. ज्यावेळी स्त्री ही खुलेपणाने श्वास घेऊन पुरुषा इतकेच स्वतंत्र जीवन जगू शकेल त्यावेळी स्त्रीवादाची गरज भासणार नाही.

संदर्भ ग्रंथ

१. स्त्रीवादी समीक्षा : डॉ.अश्विनी धोंगडे, प्रकाशक दिलीपराज प्रा.लि., पृ.क्र.१
२. स्त्री आणि पुरुष : डॉ.अश्विनी धोंगडे, प्रकाशक राजीव दत्तात्रय बर्वे, पृ.क्र.२, ४७
३. प्रदक्षिण खंड